# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.deptraffic@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९५७ /२०२४ दि.२६/०८/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी, ठाणेनगर** वाहतूक उपविभागाचे हद्दीत दि. २६/०८/२०२४ रोजी मा. मुख्यमंत्री सो, महाराष्ट्र राज्य, मुंबई आनंद आश्रम व शक्तीस्थळ येथे भेट देणार आहेत. सदर वेळी नमूद ठिकाणी मोठया प्रमाणावर गर्दी होणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी, पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे:–

**प्रवेश बंद –** १) कोर्टनाका कडून आनंद आश्रम, अग्यारी लेन समोरून टॉवरनाका कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समोर 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक, कोर्टनाका येथून जांभळीनाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) ठाणे रेल्वे स्टेशन कडून टॉवरनाका मार्गे टेंभीनाका कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **टॉवरनाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने टॉवरनाका येथून गडकरी सर्कल मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) पारेख ट्रान्सपोर्ट कडून ए. के. एम. मैदान, खारकर आळी कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **पारेख ट्रान्सपोर्ट** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने सिडको रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४) कोर्टनाका कडून ए. के. एम. मैदान, खारकर आळी कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **पोलीस स्मारक उदयान** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने एन. के. टी. कॉलेज व सेंट्रल मैदान मार्गे क्रिकनाका कडून इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ५) मार्केट मधून खारकरआळी मार्गे शक्तीस्थळ ए. के. एम. मैदान, खारकर आळी कडे येणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **महाजनवाडी हॉल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने महाजनवाडी हॉल येथून डावे वळण घेवून कोर्टनाका सर्कल मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर अधिसूचना दि. २६/०८/२०२४ रोजी सकाळी ११:०० वा. ते १५:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनास लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

CamScanner

**<u>प्रत माहितीसाठी सादर,</u>**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१/वि.शा. ठाणे

**<u>प्रत कार्यवाहीसाठी</u> :–**
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे, भिवंडी
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

**<u>प्रत</u>** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**<u>प्रत</u>** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**<u>प्रत</u>** :– सपोआ ठाणे वाहतूक विभाग व पो.नि. नौपाडा, ठाणेनगर, कळवा, राबोडी वाहतूक उपविभाग, ठाणे शहर

CamScanner